नगरसचिव कार्यालय
पुणे महानगरपालिका
दिनांक:१७/०४/२०२६

पुणे महानगरपालिका
मा. स्थायी समिती
कार्यपत्रिका क्र.४

मा.स्थायी समितीची साप्ताहिक सभा **गुरुवार, दि.२३/०४/२०२६ रोजी, सकाळी ११:३० (अकरा वाजून तीस मिनिटे) वाजता मा.स्थायी समिती सभागृह , दुसरा मजला, पुणे महानगरपालिका (नवीन विस्तारित इमारत) येथे** भरेल.

सदर सभेत खालील विषयांचा विचार होईल.

वृत्तांत कायम करणे.

सेवकवर्गाची प्रकरणे

विषय क्र.८८

श्री. गणेश दत्ता चव्हाण, हुद्दा – सफाईसेवक (वर्ग ४) धनकवडी सहकारनगर क्षेत्रीय कार्यालय यांचे निलंबन प्रकरणी तिसरी सहामाही दिनांक १०/०१/२०२५ ते ०९/०७/२०२५ व चौथी सहामाही १०/०७/२०२५ ते दिनांक ०९/०१/२०२६ रोजी पूर्ण झालेली आहे सदरची बाब मनपा सेवा विनियम क्र. ५८ नुसार निदर्शनास आणणेबाबत मा. अति. महा. आयुक्त (इ) यांचा जा.क्र.मआ/साप्र/२०, दि. १६/०४/२०२६ रोजीचे पत्र.

सर्वात कमी रकमेचे टेंडर्स

विषय क्र.८९

पुणे मनपाच्या समान पाणीपुरवठा प्रकल्पा अंतर्गत मुख्य दाब नलिकांची उर्वरित कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ५ टेंडर्स पैकी ठेकेदार मे. R. B. Krishnani यांचे टेंडर सर्वात कमी रकमेचे (टेंडर र.रु.५३२९६११८/- पेक्षा ९.०९९% ने कमी) असल्याने त्यांचे कडून र.रु.४८४४६७०४=२२ अधिक जी.एस.टी.र.रु. ८७२०४०७/- पर्यंत अधिक रॉयल्टीचार्जेस र.रु.१७४६७४५=२४ पर्यंत अधिक मटेरिअल टेस्टिंग चार्जेस र.रु.०/- पर्यंत अशी एकूण र.रु.५८९१३८५६=२२ तसेच वर्क ऑर्डर दिनांका पासून काम सुरु करणेस दरवर्षी उपलब्ध होणाऱ्या तरतुदीनुसार (सध्या उपलब्ध र.रु.७१२५८४१३) पर्यंत तसेच अधिक विशेष भाववाढ व सर्वसाधारण भाववाढ सूत्रानुसार फरक अदा करणेस / कपात करणेस व त्यांचेशी करारनामा करून, काम करून घेणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त (ज) यांचे जा.क्र.मआ/पापु/१९, दि. १५/०४/२०२६ चे पत्र.

सर्वात जास्त रकमेचे टेंडर्स

विषय क्र.९०

पुणे पेठ बुधवार येथील महात्मा फुले मंडई परिसरातील आर्यन वाहनतळ मक्ता पद्धतीने व्यवस्थापन व संचलन करणे या वाहनतळाच्या कार्यादेश दिनांकापासून ३ वर्षाच्या कालावधीकरिता चालविणे करिता निविदा

मागविल्या असता आलेल्या ५ निविदांपैकी सर्वाधिक दर देणारे निविदादार मे. इंडिया एन्टरप्रयाझेस, यांनी देऊ केलेली वार्षिक रक्कम रुपये ६२,०७,७८३=७७८ ही मनपा निर्धारित रक्कम रुपये ४२,४३,८५५/- पेक्षा र.रु. १९,६३,९२८=७७८ पेक्षा (४६.२२७ % ने जास्त) असल्याने त्यांची निविदा स्वीकारून कार्यादेश दिनांकापासून ३ वर्ष कालावधीसाठी टेंडर अटी व शर्ती प्रमाणे प्रती वर्षी २ % आयकर घेणेस व त्यांचे बरोबर करारनामा करणेस मा. स्थायी समिती मार्फत मा. मुख्यसभेची मान्यता मिळणे बाबत मा. अति.महा.आयुक्त (वि) यांचे जा.क्र.मआ/प्रकल्प/१८, दि. १५/०४/२०२६ चे पत्र.

मागील सभेचे विषय

विषय क्र.९१

पुणे पेठ कोंढवा बु. स.नं.५५ व ५६ मधील टिळेकर नगरकडे जाणा-या अस्तित्वातील ६.०० मी. रुंद रस्ता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम २१० (१) (अ) अन्वये बांधकाम विकास विभागाने सादर केलेल्या नकाशात लाल रंगाने दर्शविल्यानुसार १२.०० मी. रुंदीची रस्ताप्रमाणरेषा निश्चित करणेस मान्यता मिळणे बाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र./मआ/भूसंपादन/१३, दि.०९/०४/२०२६ चे पत्र.

(टिप:- सदर विषयाचा विचार पुढील सभेत करण्यात यावा, असे दि. १६/०४/२०२६ च्या सभेत ठरले होते.)

विषय क्र.९२

मा. स्मिता सुधीर कोंढरे, मा. सौ. वैशाली बनकर, मा. सुहास टिंगरे व मा. अमोल बालवडकर यांचे दि.११/०३/२०२६ चे पत्रावर झालेला मा. स्थायी समिती, पुणे मनपा ठराव क्र.१९८७ दि.१३/३/२०२६ अन्वये मागविण्यात आलेला मा.महा.आयुक्त यांचा जा.क्र.मआ/अतिक्रमण/१४, दि.०९/०४/२०२६ चा अभिप्राय विचारासाठी.

(टिप:- सदर विषयाचा विचार पुढील सभेत करण्यात यावा, असे दि. १६/०४/२०२६ च्या सभेत ठरले होते.)

संकीर्ण

विषय क्र.९३

पुणे पेठ स.नं.१८ ही.नं. ३ डी ४ व ३९/२ वारजे (शहीद भगतसिंग ग्रंथालय) येथील वसंत कमल विहार सोसायटीचा अमेनिटी स्पेस मधील मल्टीपर्पज हॉल (क्षेत्रफळ १५७.३० चौ.मी.) या वास्तूमध्ये पुणे महानगरपालिका समाज विकास विभाग व स्काय फाउंडेशन डी – १० पहिला मजला पोप्युलर नगर, वारजे, पुणे या संस्थेस भाडे तत्वावर देणे कामी मा. महा. आयुक्त यांच्या विषयपत्रातील अ.क्र. १ ते ९ बाबींस मा. स्थायी समिती मार्फत मा. मुख्य सभेची मान्यता मिळणे बाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र./मआ/समाजविकास/२१, दि.१७/०४/२०२६ चे पत्र.

नगरसचिव

पुणे महानगरपालिका